ePaper

## नितीश कुमार बिहारच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार?



वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज (TM)

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 05 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



आयटी पार्क आता कोंडीमुक्त!

## खासदार सुप्रिया सुळेंनी मविआतील मित्र पक्षांचे मानले आभार

# सस्पेन्स संपला! मविआकडून राज्यसभेसाठी

# शरदचंद्र गोविंदराव पवार

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**महाविकास आघाडीकडून राज्यसभा निवडणुकीसाठी शरद पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. याबद्दलची घोषणा काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत शरद पवार यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस शपच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे आभार मानले. राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. शरद पवार रिंगणात उतरल्यानं राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे.**

### विजय वडेट्टीवार यांनी काय म्हटलं?

“आमचा राष्ट्रीय पक्ष आहे, त्यामुळे आम्ही राज्यसभेच्या जागेचा आग्रह धरला होता. राज्यसभेची जागा आम्हाला द्यावी आणि विधानपरिषदेची जागा उद्धव ठाकरे यांनी घ्यावी, अशी आमची मागणी होती. ही मागणी आम्ही पक्षाच्या हायकमांडकडेही मांडली होती. पण राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या काही नेत्यांनी दिल्लीत हायकमांडशी संपर्क केला, आणि तसेच उद्धव ठाकरे यांच्याशीही संपर्क केला आणि त्यांची भूमिका ठाम पणे मांडली. तसेच आमच्या प्रदेशाध्यक्षांशी देखील खासदार सुप्रिया सुळे यांनी चर्चा केली. त्यामुळे आमच्या पक्षाच्या हायकमांडने शरद पवार यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. आम्हाला आमच्या पक्षाच्या हायकमांडकडून फोन आला आणि आमची सविस्तर चर्चा झाली. चर्चेत आपण महाविकास आघाडीची भूमिका घेतली पाहिजे असं अधोरेखित झालं. त्यांच्याकडून सांगण्यात आलं की, शरद पवार यांना पाठिंबा देऊन त्यांना राज्यसभेवर पाठवलं पाहिजे”, असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं.



राज्यातील राज्यसभेच्या ७ जागा रिक्त होत आहेत. यातील ४ जागा महाविकास आघाडीच्या आहेत. मविआच्या ४ खासदारांचा कार्यकाळ २ एप्रिलला संपणार आहे. एकूण ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान होईल. महाविकास आघाडीकडे केवळ १ जागा जिंकण्याइतकं संख्याबळ आहे. मविआत शिवसेना उबाठाचे २०, काँग्रेसचे १६ आणि राष्ट्रवादी शपचे १० आमदार आहेत. त्यांची बेरीज ४६ च्या घरात जाते. राज्यसभेची १ जागा जिंकण्यासाठी ३७ मतांची गरज आहे.

काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत खासदार सुप्रिया सुळेंनी शरद पवारांच्या नावाची घोषणा केली. राज्यसभेसाठी शरद पवारांच्या नावाला पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांचे आभार मानले. 'महाविकास आघाडीतील पक्षांची साथ कायम राहणार आहे. आम्ही पूर्ण ताकदीनं एकमेकांना साथ देऊ. काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांनी मोठं मन दाखवलं, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे,' असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार, बंटी पाटील यावेळी उपस्थित होते. पण शिवसेना उबाठाचा एकही नेता पत्रकार परिषदेला हजर नव्हता. या गैरहजेरीबद्दल सुळे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर खासदार संजय राऊत आताच शरद पवारांना सिल्व्हर ओकवर येऊन भेटून गेले. त्यांनी तब्येतीची विचारपूस केली. उद्धव ठाकरेंनी उमेदवारीला पाठिंबा दिला. त्याबद्दल मी त्यांची आभार आहे, असं सुळे म्हणाल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

शरद पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्यानं ही निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. पवारांच्या व्यतिरिक्त अन्य उमेदवार असता, तर भाजप प्रणित महायुतीकडून अतिरिक्त उमेदवार देऊन मविआची मतं फोडली जाण्याची शक्यता होती. विशेषत: काँग्रेस, शिवसेना उबाठाचा उमेदवार रिंगणात असता, तर मतांची फाटाफूट करण्याचे प्रयत्न झाले असते. तशी चर्चा गेल्या आठवड्यापासून सुरु होती.

शरद पवारांच्या संसदीय कारकिर्दीला ५९ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत ते विधानसभा, लोकसभा, राज्यसभेवर अनेकदा निवडून गेले आहेत. विशेष म्हणजे या कालावधीत ते एकही निवडणूक हरलेले नाहीत. ते एकदा नाही तर दोनदा राज्यसभेवर गेले आहेत. दोन्ही वेळा त्यांची निवड बिनविरोध झालेली आहे. त्यामुळे यंदाही पवार हाच ट्रॅक रेकॉर्ड कायम राखणार का, याची उत्सुकता आहे.

# आयटी पार्क आता कोंडीमुक्त!

## पुणे वाहतूक पोलिस यांच्यासह पीएमपीएमएलचा मोठा निर्णय

**महाईन्यूज । पुणे**

**हिंजवडी आयटी पार्क परिसरात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. विशेषतः सकाळी आणि संध्याकाळी कार्यालयीन वेळेत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून आयटी कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर हिंजवडी वाहतूक विभागाने वाहतूक सुरळीत करण्यासाठी काही महत्त्वाची पावले उचलली असून अनेक पीएमपीएमएल बसथांबे स्थलांतरित करण्यात आले आहेत.**



हिंजवडी आयटी पार्कमध्ये दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. त्यात तुलनेत रस्ते अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे सकाळी आणि संध्याकाळी कार्यालयीन वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. आयटी पार्कमधील रस्त्यावर कोंडीचे चित्र नित्याचेच बनले आहे. आता या परिस्थितीत सुधारणा करण्याचे पाऊल पडू लागले आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पीएमपीएमएलच्या काही प्रमुख बसथांब्यांचे स्थान बदलण्यात आले आहे. यामध्ये सावतमाळी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेझा-९, टाटा टी-जंक्शन, विप्रो फेज २ सर्कल, पॉवर हाउस स्टेशन आणि एमआयडीसी सर्कल या बसथांब्यांचा समावेश आहे. या ठिकाणी बस थांबत अस ल्यामुळे मुख्य रस्त्यावर वाहतुकीचा वेग मंदावत असल्याचे कारण समोर आले होते. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते फेज १ सर्कल हा रस्ता एकेरी (वन-वे) करण्यात आल्यानंतर पर्सिस्टंट कंपनीसमोरील बसथांबाही हटवण्यात आला आहे. या बदलामुळे या मार्गावरील वाहतूक अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### बसथांबे स्थलांतरित करणार

हिंजवडी वाहतूक पोलीस विभाग आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त प्रयत्नातून वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी पुढील काळात आणखी उपाययोजना करण्यात येणार आहेत. विशेषतः मेट्रो सेवा पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर आणखी काही बसथांबे स्थलांतरित केले जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. चुकीच्या दिशेने वाहन चालवणे (रॉंग साईड ड्रायव्हिंग) टाळणे, गर्दीच्या चौकांजवळ अनावश्यक पिक-अप आणि ड्रॉप टाळणे तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

## दुबई येथून १११ नागरिक पुण्यात सुखरूप पोहोचले – जिल्हाधिकारी

**महाईन्यूज । पुणे**

**मध्यपूर्व व आसपासच्या काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुबई येथे अडकलेल्या जिल्ह्यातील एकूण १८४ नागरिकांपैकी १११ नागरिक पुण्यात सुखरूप पोहोचले आहेत. तसेच १९ नागरिकांच्या विमान उड्डाणाची वेळ बदलण्यात आली असून ५४ नागरिकांना परत आणण्याची प्रक्रिया सुरु आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.**



भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार परदेशात वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण सूचना जारी करण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांनी आवश्यक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधावा.

पॅलेस्टाईन (रामल्लाह), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद), कुवेत, बहारीन, मस्कत, जॉर्डन तसेच संयुक्त अरब अमिरात (अबूधाबी) येथे वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे, अनावश्यक हालचाली टाळाव्यात व स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शासनाच्या वतीने वेळोवेळी करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशांतील भारतीय दूतावासांच्या २४X७ हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले असून, दूतावासांकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

परदेशात वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांनी शांतता व संयम राखावा, अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे, आणि आवश्यक असल्यास तात्काळ भारतीय दूतावासांशी संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र शासनाने केले आहे. केंद्र सरकार व संबंधित दूतावासांशी समन्वय ठेवून, महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागरिकांच्या सुरक्षेबाबत सतर्कता बाळगली जात आहे.

संबंधित देशांतील भारतीय दूतावासांचे संपर्क तपशील नागरिकांच्या सोयीसाठी प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यानुसार पॅलेस्टाईन (रामल्लाह) येथे फोन : +९७०-५९२९१६४१८, ई-मेल : REPOFFICE@MEA.GOV.IN/ CONS.RAMALLAH@MEA.GOV.IN कतार (दोहा) येथे फोन : ००९७४-५५६४७५०२, ई-मेल : CONS.DOHA@MEA.GOV.IN सौदी अरेबिया (रियाध) येथे फोन : ००-९६६-११-४८८४६९७, व्हॉट्सअॅप : ००-९६६-५४२१२६७४८, टोल फ्री : ८००-२४७-१२३४, ई-मेल : CW.RIYADH@MEA.GOV.IN

इस्रायल (तेल अवीव) येथे फोन : +९७२-५४-७५२०७११/ +९७२-५४-२४२८३७८, ई-मेल : CONS1.TELAVIV@MEA.GOV.IN इराण (तेहरान) येथे फोन : +९८९१२८१०९११५, +९८९१२८१०९१०९, +९८९१२८१०९१०२, +९८९९३२१७९३५९,

संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी / दुबई) येथे टोल फ्री : ८००-४६३४२, व्हॉट्सअॅप : +९७१५४३०९०५७१, ई-मेल : PBSK.DUBAI@MEA.GOV.IN /CA.ABUDHABI@MEA.GOV.IN

कुवेत येथे फोन : +९६५६५५०११४६, ई-मेल : COMMUNITY.KUWAIT@MEA.GOV.IN बहरीन येथे ोन : ००९७३-३९४१८०७१,

मस्कत येथे टोल फ्री : ८००७१२३४, व्हॉट्सअॅप : +९६८९८२८२२७०, ई-मेल : CW.MUSCAT@MEA.GOV.IN/ CONS.MUSCAT@MEA.GOV.IN जॉर्डन येथे फोन : ००९६२-७७० ४२२ २७६ आणि इराक (बगदाद) येथे फोन : +९६४ ७७१ ६५१ ११८५ / +९६४ ७७०४४४ ४८९९, वेबसाईट : HTTPS://WWW.EOIBAGHDAD.GOV.IN/ तसेच ई-मेल : CONS.BAGHDAD@MEA.GOV.IN/ CONS1.BAGHDAD@MEA.GOV.IN/ POL.BAGHDAD@MEA.GOV.IN नागरिकांना संपर्कासाठी उपलब्ध आहेत.

# उत्पन्न वाढीसह शहर प्रदूषणमुक्तीवर भर

## मनपाच्या पहिल्या स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मान्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासोबतच शहराच्या शाश्वत विकासासाठी 'इन्कम जनरेशन' आणि 'प्रदूषण नियंत्रण' या दोन सूत्रांवर भर दिला जाणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज दिली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आज स्थायी समितीची सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते.**



या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर,नगरसचिव मुकेश कोळप , अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते. स्थायी समितीच्या बैठकीत विविध विषयांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सभापती अभिषेक बारणे यांनी दिली. स्थायी समिती सभापती दालनात प्रशासकीय कामकाजाबाबत सविस्तर भूमिका मांडताना ते बोलत होते.

बैठकीत मनपाच्या मुख्य लेखा विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जाला मंजुरी देण्यात आली. तसेच, महापालिकेच्या वतीने "मराठी भाषा गौरव दिना"निमित्त दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमासाठी यामध्ये कलाकार, वक्ते मानधन, सांस्कृतिक कार्यक्रम असा एकूण खर्च र. रु. ७,५०,०००/- (अक्षरी र.रु. सात लाख पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. महापालिकेच्या आर्थिक नियोजनाबाबत बोलताना अभिषेक बारणे यांनी स्पष्ट केले की, सध्या पालिकेवर दायित्व (LIABILITY) अधिक आहे.

महापालिकेच्या ठेवींबाबत भाष्य करताना अभिषेक बारणे यांनी सांगितले की, "महापालिकेच्या आवश्यक ठेवींमध्ये कोणतीही घट झालेली नाही. त्या पूर्णपणे सुरक्षित आहेत. तरीही, या आरोपांची सविस्तर माहिती घेऊन योग्य ती चौकशी केली जाईल." अत्यावश्यक नसलेली नवीन कामे तूर्तास थांबवून केवळ गरजेच्या कामांनाच प्राधान्य दिले जाणार आहे. आजच्या सभेत प्रलंबित राहिलेल्या विषयांवर आणि विविध उपसूचनांवर पुढील सभेत सविस्तर चर्चा करून निर्णय घेतला जाईल. कोणत्या विभागाने किती कामे केली आणि कोणती प्रलंबित ठेवली, याचा 'प्रोग्रेस रिपोर्ट'ही संबंधित अधिकारी यांच्याकडे मागविला असल्याचे त्यांनी सांगितले.

### खर्चात कपात आणि पारदर्शक कारभार

पदाधिकाऱ्यांच्या वाहन भाड्याबाबत होणाऱ्या चर्चेवर स्पष्टीकरण देताना सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, "चालकांची कमतरता असल्याने भाडेतत्त्वावर गाड्या घेण्याचे जुने धोरण आहे. मात्र, सव्वा लाख रुपये महिना यांसारख्या मोठ्या बिलांची आणि दरांची आम्ही पुन्हा शहानिशा करणार आहोत. इंधन, चालक आणि देखभाल यासह वाजवी दरात सेवा मिळावी, यासाठी खर्चात कपात करण्याचे आमचे धोरण आहे." त्यानुसार पदाधिकारी स्वेच्छेनुसार त्यांना दरमहा ५० हजार रुपये खर्च देण्याबाबत विचार विनिमय सुरु आहे. तसेच, प्रत्येक विभागाच्या कामाचा आढावा घेऊनच बिले अदा केली जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### प्रदूषणमुक्तीसाठी 'ॲक्शन प्लॅन'

शहरात सुरू असलेल्या बांधकामांच्या ठिकाणी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत सभापती अभिषेक बारणे यांनी कडक पावले उचलली आहेत. "शहरात धुळीचे प्रमाण वाढू नये आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये, यासाठी बांधकाम सुरक्षा (SAFETY) तपासण्यासाठी दोन विशेष पथके तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्या हद्दीतील मोठ्या कामांची प्रगती आणि सुरक्षिततेची नियमित देखरेख करावी," असे निर्देश सभापती बारणे यांनी बैठकीत दिले.

# सुविधा पार्कसमोरील रस्त्यावर 'वॉकिंग ट्रॅक' करा; नगरसेविका सोनाली गव्हाणे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रभाग क्र. ७ भोसरी गावठाण-गव्हाणे वस्तीच्या नगरसेविका प्रा. सोनाली गव्हाणे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर यांच्याकडे निवेदन सादर करून सुविधा पार्कलगतच्या रस्त्यावर स्वतंत्र आणि सुरक्षित 'वॉकिंग ट्रॅक' विकसित करण्याची मागणी करण्यात आली आहे.**



प्रा. गव्हाणे यांनी सांगितले की, प्रभागातील नागरिक सकाळी आणि संध्याकाळी 'मॉर्निंग वॉक'साठी सुविधा पार्कात येतात. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिलांना आणि लहान मुलांना चालण्यासाठी सुरक्षित जागा मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सध्या रस्त्यावर स्वतंत्र ट्रॅक नसल्यामुळे नागरिकांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागते, ज्यामुळे अपघाताचा धोका वाढतो आणि वाहतुकीमध्ये अडथळा निर्माण होतो. "सुरक्षित आणि समतल वॉकिंग ट्रॅक असल्यास नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारणे सोपे होईल," असे प्रा. गव्हाणे यांनी नमूद केले.

प्रा. गव्हाणे यांनी निवेदनात पुढील बाबींचा प्रस्ताव केला आहे: यामध्ये रबराईज्ड किंवा पेवर ब्लॉकसह समतल आणि सुरक्षित वॉकिंग ट्रॅक, पर्याप्त प्रकाशव्यवस्था, ज्यामुळे सकाळी आणि संध्याकाळी सुरक्षितता सुनिश्चित होईल. बसण्याची बाके व कचरापेट्या, हरितपट्टा व सुशोभीकरण, जे परिसराची सौंदर्यवृद्धी करेल. ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी सुलभ प्रवेश मिळावा, असे सूचवले आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळेल. तसेच महापालिकेच्या "फिट सिटी" संकल्पनेला चालना मिळेल.

यासाठी महापालिकेच्या २०२६-२७ अंदाजपत्रकात या कामासाठी आवश्यक तरतूद करणे. संबंधित विभागाकडून तांत्रिक प्रस्ताव तातडीने सादर करणे, प्रकल्पाची अंमलबजावणी लवकरात लवकर सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यामुळे सुविधा पार्क आणि परिसरातील नागरिकांना सुरक्षित व चालण्यासाठी योग्य जागा उपलब्ध होईल. महापालिकेच्या आरोग्य व फिटनेस उपक्रमांना चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. असे प्रा. सोनाली गव्हाणे यांनी म्हंटले आहे.

> "सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. सुविधा पार्कलगत स्वतंत्र वॉकिंग ट्रॅक तयार केल्यास प्रभागातील सर्व नागरिक, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि महिला, सकाळी व संध्याकाळी आनंदाने चालायला येऊ शकतील. माझा विश्वास आहे की हा उपक्रम प्रभागाच्या आरोग्यवर्धक जीवनशैलीला नक्की चालना देईल.
>
> **– प्रा. सोनाली गव्हाणे,**
> नगरसेविका, प्रभाग क्र. ७,
> पिंपरी-चिंचवड, पुणे.



## भूमिका

**भारतीय आयटी उद्योग आज एका निर्णायक वळणावर उभा आहे. गेली तीन दशके भारताने जागतिक स्तरावर 'आऊटसोर्सिंग हब' म्हणून आपली भक्कम ओळख निर्माण केली. सॉफ्टवेअर विकास, चाचणी प्रक्रिया, बीपीओ, कॉल सेंटर्स आणि बॅक-ऑफिस सेवा या क्षेत्रांत लाखो तरुणांना रोजगार उपलब्ध झाला.**

# भारतीय आयटी क्षेत्रापुढे मोठे आव्हान

या उद्योगामुळे देशाच्या परकीय चलनसाठ्यात मोठी भर पडली आणि भारतीय अर्थव्यवस्थेला स्थैर्य लाभले. मात्र आता या यशस्वी मॉडेलसमोर एक नवे आणि गंभीर आव्हान उभे राहिले आहे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि स्वयंचलन. आयटी कंपन्यांनीच विकसित केलेली एआय तंत्रज्ञान प्रणाली आता त्यांच्या पारंपरिक व्यवसाय मॉडेललाच आव्हान देत आहे. कोडिंग, सॉफ्टवेअर टेस्टिंग, डेटा प्रोसेसिंग, ग्राहक सेवा यांसारखी कामे एआयद्वारे वेगाने आणि अचूकतेने पूर्ण होत आहेत. त्यामुळे मानवी हस्तक्षेपाची गरज कमी होत आहे. याचा थेट परिणाम रोजगारावर होण्याची शक्यता आहे. काही आंतरराष्ट्रीय अहवालांनुसार जगभरातील कोट्यवधी नोकऱ्यांवर स्वयंचलनाचा परिणाम होऊ शकतो. भारतासारख्या देशासाठी ही बाब अधिक चिंताजनक आहे, कारण येथे



मोठ्या प्रमाणावर तरुणवर्ग आयटी आणि संबंधित सेवांवर अवलंबून आहे. माहिती-तंत्रज्ञानापुरते हे आव्हान मर्यादित नाही. शिक्षण, आरोग्य, वित्त, शेती, संरक्षण अशा जवळजवळ सर्वच क्षेत्रांत एआयचा प्रभाव वाढत आहे. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांना त्वरित उत्तरे मिळतात, जटिल संकल्पना सोप्या पद्धतीने समजतात; परंतु त्याचवेळी स्वयंपूर्ण विचारशक्ती कमी होण्याची भीती व्यक्त केली जाते. सहज उपलब्ध माहितीतून 'स्वतः शोध घेण्याची वृत्ती' कमी होऊ शकते. उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेच्या बाबतीतही प्रश्न निर्माण होतात. एआय प्रणालींची गती मानवी क्षमतेपेक्षा अधिक असल्याने चुकीची माहिती किंवा खोट्या बातम्या वेगाने पसरू शकतात. सायबर गुन्हेगार या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून दिशाभूल करणारी सामग्री तयार करू शकतात. आज एआयच्या साहाय्याने बनावट छायाचित्रे आणि व्हिडिओ सहज तयार होऊ शकतात, ज्याचा वापर प्रचारासाठी किंवा अपप्रचारासाठी होऊ शकतो. डेटा सुरक्षेचा मुद्दा देखील अत्यंत महत्त्वाचा आहे. कंपन्यांकडे वापरकर्त्यांचा मोठ्या प्रमाणावर डेटा उपलब्ध असतो. एआय त्या डेटाचे विश्लेषण करून व्यक्तींच्या सवयी, आवडी-निवडी आणि वर्तन नमुने ओळखू शकते. याचा सकारात्मक उपयोग वैयक्तिक सेवा देण्यासाठी होऊ शकतो; परंतु त्याचवेळी गोपनीयतेचे उल्लंघन आणि बनावट प्रोफाइल तयार करण्यासारखे धोकेही संभवतात. काही काळापूर्वी तांत्रिक त्रुटींमुळे एआय प्रणालींमधील माहिती गळतीची उदाहरणे समोर आली होती. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कडक नियमन आणि सायबर सुरक्षा उपाय आवश्यक ठरणार आहेत. संरक्षण क्षेत्रात एआयचा वापर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन नियंत्रणासाठी केला जातो. सध्या या प्रणाली मानवी आदेशांवर कार्य करतात; परंतु भविष्यात अधिक स्वायत्त निर्णयक्षमता विकसित झाल्यास नैतिक आणि सुरक्षाविषयक गुंतागुंत वाढू शकते. त्यामुळे तांत्रिक प्रगतीसोबतच नैतिकता आणि नियंत्रण यांचा समतोल राखणे गरजेचे आहे. या सर्व आव्हानांमध्ये संधीही दडलेली आहे. एआयमुळे उत्पादकता वाढू शकते, नव्या प्रकारच्या नोकऱ्या निर्माण होऊ शकतात आणि जागतिक स्पर्धेत भारताला आघाडी मिळू शकते. पारंपरिक सेवांऐवजी उच्च दर्जाच्या संशोधन आणि तंत्रज्ञान विकासावर भर दिल्यास भारतीय आयटी उद्योग नव्या टप्प्यावर पोहोचू शकतो. यासाठी कौशल्यविकास, अपस्किलिंग आणि रिस्किलिंग या बाबींवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शिक्षण व्यवस्थेतही तांत्रिक ज्ञानासोबत सर्जनशीलता, चिकित्सक विचारशक्ती आणि नैतिक मूल्यांचा समावेश करावा लागेल.

## प्रासंगिक »

### मुंगी

***उन्हाळ्याचे दिवस होते. एक मेहनती मुंगी दिवसभर अन्न गोळा करत होती. ती धान्याचे दाणे आपल्या वारुळात साठवत होती. त्याच वेळी एक टोळ गाणे गात, नाचत मस्तीत वेळ घालवत होता.***

टोळ मुंगीला म्हणाला, "अगं, एवढं कशाला कष्ट करतेस? ये ना, माझ्यासोबत मजा कर!" मुंगी शांतपणे म्हणाली, "आता उन्हाळा आहे. पण लवकरच पावसाळा आणि थंडी येईल. त्यासाठी अन्न साठवणे गरजेचे आहे." टोळ तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून मजेत राहिला. काही महिन्यांनी थंडी सुरू झाली. पाऊस पडू लागला. टोळाला अन्न मिळेना. तो उपाशीपोटी थरथरत मुंगीच्या दाराशी आला. मुंगीने आपले साठवलेले अन्न काढून खाल्ले, कारण तिने वेळेवर मेहनत केली होती. टोळाला आपल्या आळशीपणाची जाणीव झाली.

तात्पर्य : वेळेचे महत्त्व ओळखून जर कष्ट केले तर कितीही संकटे आली तरी त्या संकटातही आधार मिळतो.

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या हत्येनंतर इराण देश प्रचंड संतापलेला दिसतो. खामेनेई यांच्या हत्येनंतर कदाचित युद्ध पुढे चालणार नाही आणि इराण शरणागती पत्करेल, असा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा कयास होता.

# युद्धाचा प्रवास अणुयुद्धाच्या दिशेने!

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या हत्येनंतर मध्यपूर्वेत तणावाने कळस गाठला आहे. या घटनेनंतर इराण शरणागती पत्करेल, असा अंदाज Donald Trump यांनी व्यक्त केला होता. परंतु प्रत्यक्षात इराणने आक्रमक भूमिका घेत अमेरिकेचे तळ ज्या राष्ट्रांमध्ये आहेत, त्या ठिकाणी हल्ले चढवले. त्यामुळे संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. सध्या इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यात उघड संघर्ष सुरू असल्याचे चित्र आहे. अमेरिका व इस्रायल एकत्रितपणे इराणवर दबाव वाढवत आहेत, तर इराणही सर्व शक्तीनिशी प्रत्युत्तर देत आहे. इराणच्या लक्षात आले की आता आपण पूर्णतः चक्रव्यूहामध्ये सापडलेलो आहोत. अमेरिकेला आसरा दिलेल्या कुवेत, युएई, इराक, सौदी अरेबिया आणि बहरीन यांनाही या संघर्षाचा फटका बसत आहे.



लाखो नागरिकांवर संकट कोसळले असून निरपराधांचा बळी जात आहे. तेलसंपत्तीभोवती फिरणारे जागतिक राजकारण आणि महासत्तांची स्पर्धा यामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनली आहे. दरम्यान, युद्ध सुरू असतानाच इराणमध्ये 4.3 रिश्टर स्केलचा भूकंप नोंदवला गेला. या नैसर्गिक आपत्तीमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

काही तज्ज्ञांच्या मते, सततचे हल्ले आणि अंतर्गत अस्थिरता यामुळे इराण आणखी टोकाचा निर्णय घेऊ शकतो. इराणकडे मोठ्या प्रमाणात युरेनियम साठा असून 25 ते 26 अणुबॉम्ब तयार करण्याची क्षमता असल्याचा दावा केला जात आहे. जर या संघर्षात अण्वस्त्रांचा वापर झाला, तर त्याचे परिणाम केवळ या प्रदेशापुरते मर्यादित राहणार नाहीत, तर संपूर्ण जगाला त्याची किंमत चुकवावी लागेल.

इतिहास साक्षी आहे की 6 आणि 9 ऑगस्ट 1945 रोजी अमेरिकेने जपान मधील हिरोशिमा आणि नागासाकी येथे अणुबॉम्ब टाकले तेव्हा लाखो लोकांचा जीव गेला. त्या घटनेची वेदना आजही मानवजातीला अस्वस्थ करते. सध्याची परिस्थिती तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने झुकत असल्याची भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित राष्ट्रांनी संयम राखून संवादाचा मार्ग स्वीकारणे अत्यावश्यक आहे. सूड, वर्चस्व आणि आर्थिक हितसंबंध यापलीकडे जाऊन मानवी मूल्यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. अन्यथा हा संघर्ष केवळ राष्ट्रांचा नाही, तर संपूर्ण मानवजातीच्या भवितव्याचा प्रश्न ठरू शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



|| क्षणभरी आह्मी सोसिलें वाईट ॥ १ ॥
॥ साधिलें अवीट निजसुख ॥ २ ॥

॥ सांडी मांडी मागें केल्या भरोवरी।।३।।
अधिक चि परी दुःखाचिया ।।४।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गृहनिर्माण संस्थांना मोठा दिलासा; अकृषिक 'एनए' कर कायमचा रद्द...

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत घोषणा

**महाईन्यूज** | मुंबई

**राज्यातील गृहनिर्माण संस्थांवर आकारला जाणारा अकृषिक (एनए) कर रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला असून, यापुढे जुन्या किंवा नव्या कोणत्याही बांधकामांवर हा कर आकारला जाणार नाही. तसेच पूर्वीची थकबाकीदेखील सरकारने माफ केली असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधानसभेत केली.**



प्रश्नोत्तराच्या तासात भीमराव तापकीर यांनी शहरी भागातील गृहनिर्माण संस्थांसाठी अकृषिक कर माफ करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला. त्यावर महसूल मंत्री बावनकुळे यांनी हा निर्णय स्पष्ट केला.

राज्य सरकारने वार्षिक अकृषिक कर पूर्णपणे रद्द केला आहे. त्यामुळे जुनी किंवा नवी अशी कोणतीही बांधकामे असोत, त्यांच्यावर आता एनए कर आकारला जाणार नाही. यापूर्वी आकारलेला कर तसेच थकबाकी देखील शासनाने माफ केली आहे. त्यामुळे राज्यातील गृहनिर्माण संस्था आणि फ्लॅटधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच रूपांतरण करासंदर्भात सरकारने सुलभ पद्धत लागू केली असल्याचेही सांगून, त्यानुसार २००१ पूर्वी झालेल्या बांधकामांसाठी २००१ च्या रेडी रेकनर दराच्या ०.१० टक्के इतका दर निश्चित करण्यात आला आहे. हा दर एक हजार चौरस मीटर क्षेत्रफळासाठी लागू राहील. याशिवाय मोठ्या क्षेत्रफळाच्या विकासासाठी एकरकमी रक्कम भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. चार हजार चौरस मीटरपर्यंतच्या क्षेत्रासाठी ०.२५ टक्के तर त्यापेक्षा जास्त म्हणजे एक एकराहून अधिक क्षेत्रासाठी ०.१५ टक्के इतका दर आकारून एकदाच रक्कम भरल्यास संबंधितांना पुढील करातून सूट मिळणार आहे. या नव्या प्रणालीमुळे नागरिकांना वारंवार महसूल कार्यालयात जावे लागणार नाही तसेच करप्रणाली अधिक सुलभ होणार असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले. या निर्णयामुळे गृहनिर्माण संस्थांवरील आर्थिक भार कमी होणार असून शहरी भागातील हजारो फ्लॅटधारकांना दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

या निर्णयामुळे शहरी भागातील गृहनिर्माण संस्थांसाठी अकृषिक कराच्या प्रश्नावर पूर्णविराम मिळाला असून नागरिकांना कर, दंड किंवा व्याजाचा कोणताही अतिरिक्त भार सहन करावा लागणार नसल्याचेही महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले.

---

# रायगड जिल्ह्यातील २० जण आखाती देशांत अडकले...

**महाईन्यूज** | अलिबाग

**रायगड जिल्ह्यातील २० जण युध्दजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांमध्ये अडकले आहेत. यात दुबईत येथील ४, सौदी अरेबिया येथील ६, कुवेत मधील ७ कतार मधील ३ जणांचा समावेश आहे. या शिवाय नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने आखाती देशांमध्ये कार्यरत असलेल्या नागरीकांची संख्या काही हजारांच्या घरात आहे. युध्दजन्य परिस्थितीमुळे या नागरिकांच्या कुटुंबियांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.**

रायगड जिल्ह्यातील महाड, श्रीवर्धन, म्हसळा, मुरुड, माणगाव या खाडी पट्ट्यातील नागरीक सध्या नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने आखाती देशांमध्ये स्थायिक आहेत. यात मुस्लिम बहुल वस्त्यांमधील सदस्यांची संख्या जास्त आहे. प्रत्येक कुटूंबातील किमान एक सदस्य आखाती देशांमध्ये कार्यरत आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळे सध्या सर्वजण अडकून पडले आहेत. त्यामुळे या नागरिकांच्या कुटुंबियांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. यापैकी २० जणांनी सध्या भारतात परत येण्यासाठी नियंत्रण कक्षाकडे मदत मागितली आहे.

इस्त्राईल आणि अमेरिकेनी इराणवर हल्ले चढवल्यानंतर, इराणने अमेरीकेच्या आखाती देशांमधील सैन्य तळांवर हल्ले चढवले आहेत. त्यामुळे आखाती देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालील आहे. या परिस्थितीमुळे आखाती देशात कामानिमित्ताने असलेल्या भारतीयामध्ये भिती आणि चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे आखाती देशात अडकून पडलेल्या आणि मायदेशी परतण्याची इच्छा असलेल्या भारतीयांनी आता शासकीय यंत्रणांकडे मदतीची याचना सुरू केली आहे.



जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबतची माहिती दिली आहे. उत्कर्ष राजेश मापारा हा पाली येथील रहिवाशी विद्यार्थी शैक्षणिक कारणासाठी दुबईत आहे. तो सध्या तिथे अडकून पडला आहे. उरण मधील कविश घरत आणि प्रांजली घरत हे लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी दुबईत पर्यटनाला गेले होते. तेही अडकून पडले आहेत. पोलादपूर तालुक्यातील सवाद गावातील तार्लेकर कुटूंबातील अकरा सदस्य आखाती देशांमध्ये नोकरीसाठी वास्तव्यास आहेत. पण युध्दजन्य परिस्थितीतमुळे त्यांनी मायदेशी परतण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यांनी नियंत्रण कक्षाकडे संपर्क साधून मदतीची याचना केली आहे. याच गावातील पठाण, तोलकर आणि कादरी कुटूंबातील सदस्यांनी मायदेशी परतण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

# भारताच्या सीमेजवळ युद्धाचा भडका!

## पाणबुडी हल्ल्यात १०१ सैनिकांसह इराणी युद्धनौका बुडाली, ७८ जखमी

**महाईन्यूज । कोलंबो**



**हिंदी महासागरात श्रीलंकेच्या दक्षिण किनारपट्टीवर बुधवारी एका इराणीयुद्धनौकेवर भीषण पाणबुडी हल्ला झाल्याची खळबळजनक घटना घडली. या हल्ल्यात इराणची आयआरआयएस डेना ही युद्धनौका समुद्रतळाला गेली असून, त्यावरील किमान १०१ कर्मचारी बेपत्ता आहेत, तर ७८ जण गंभीर जखमी झाले असल्याची माहिती श्रीलंकेच्या नौदलाने आणि संरक्षण मंत्रालयाने दिली.**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सुमारे १८० कर्मचारी असलेल्या या इराणी फ्रिगेटवरून पहाटेच्या सुमारास आपत्कालीन मदतीचा संदेश (डिस्ट्रेस कॉल) पाठवण्यात आला होता. ही युद्धनौका श्रीलंकेच्या किनाऱ्यापासून अंदाजे २५ मैल दक्षिणेकडे समुद्रात गस्त घालत असताना अचानक मोठा आणि भीषण स्फोट झाला आणि त्यानंतर नौका वेगाने पाण्यात बुडू लागली. संरक्षण मंत्रालयातील विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हा स्फोट एखाद्या अज्ञात पाणबुडीने केलेल्या संभाव्य हल्ल्यामुळे झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. मात्र, याबाबत अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

घटनेची माहिती मिळताच श्रीलंकेच्या नौदलाने तात्काळ आणि जलद प्रतिसाद देत दोन सुसज्ज युद्धनौका तसेच एका गस्ती विमानाच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर शोध आणि बचाव मोहीम हाती घेतली. परराष्ट्र मंत्री विजिथा हेरथ यांनी संसदेत अधिकृत माहिती देताना सांगितले की, आतापर्यंत ३० ते ३२ खलाशांना सुरक्षितरित्या समुद्रातून बाहेर काढण्यात यश आले असून त्यांना पुढील वैद्यकीय उपचारांसाठी गाले येथील मुख्य शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, बेपत्ता असलेल्या १०१ खलाशांचा शोध घेण्यासाठी नौदल आणि हवाई दलाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. समुद्रातील प्रतिकूल परिस्थिती आणि वेळ निघून जात असल्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

हा हल्ला नेमका कोणी आणि कोणत्या उद्देशाने केला, याबाबत अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. तथापि, श्रीलंकेच्या संसदेत विरोधी पक्षातील काही खासदारांनी हा प्रकार इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या प्रादेशिक संघर्षाशी संबंधित तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला आहे. सरकारकडून या संदर्भात थेट भाष्य टाळण्यात आले असले तरी, श्रीलंका आंतरराष्ट्रीय सागरी कायद्याच्या अधीन राहून मानवतावादी कर्तव्य पार पाडत असल्याचे नौदलाचे प्रवक्ते बुद्धिका संपथ यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे.

### सुरक्षेचा कडक बंदोबस्त आणि गोपनीयता

जखमी इराणी खलाशांवर उपचार सुरू असलेल्या गाले रुग्णालयाबाहेर पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. विशेष म्हणजे, दुसऱ्या देशाच्या लष्करी कारवाईशी संबंधित प्रकरण असल्याने श्रीलंकेचे नौदल किंवा हवाई दल या बचाव कार्याचे कोणतेही फुटेज जाहीर करणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. "आम्ही शोध मोहीम सुरू ठेवली आहे, परंतु उर्वरित कर्मचाऱ्यांचे काय झाले याची अद्याप कोणतीही माहिती नाही. परिस्थिती गंभीर आहे, अशी माहिती श्रीलंकेच्या नौदल अधिकाऱ्यांनी दिली.

# नितीश कुमार बिहारच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**



**काही दिवसांपूर्वी बिहारमध्ये विधानसभेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीच्या प्रचारामध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण चांगलंच रंगलं होतं. भाजप आणि काँग्रेस आमने-सामने होते. निवडणुकीमध्ये एनडीएला दणदणीत यश मिळालं. काँग्रेस आणि मित्र पक्षांचा मोठा पराभव झाला. दरम्यान त्यानंतर जेडीयूचे प्रमुख नितीश कुमार हे पुन्हा एकदा मुख्यमंत्री झाले.**

गेल्या काही दिवसांपासून बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे विविध राजकीय आणि संघटनात्मक कारणांमुळे सातत्याने चर्चेत आहेत. त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत अनेक तर्क-वितर्क लावले जात असतानाच आता एक मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे. बिहारच्या राजकारणात लवकरच मोठा बदल घडण्याचे स्पष्ट संकेत मिळत असल्याचे सांगितले जात आहे. समोर येणाऱ्या माहितीनुसार, नितीश कुमार हे मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची गंभीर शक्यता व्यक्त केली जात आहे आणि त्यामागे एक महत्त्वाचे राजकीय कारण असल्याचे बोलले जात आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, नितीश कुमार हे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन राज्यसभेवर जाण्याचा पर्याय स्वीकारू शकतात. जर असे झाले, तर त्यांच्या राजकीय प्रवासाला नवी दिशा मिळू शकते. त्यानंतर त्यांच्या चिरंजीव निशांत कुमार यांना बिहारच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ दिली जाऊ शकते, अशीही जोरदार चर्चा सुरू झाली आहे. त्याचवेळी, बिहारमध्ये भारतीय जनता पक्षाचा मुख्यमंत्री होऊ शकतो, अशा शक्यतांनाही राजकीय वर्तुळात उधाण आले आहे.

कालपर्यंत निशांत कुमार हे राज्यसभेवर जाणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र आता परिस्थितीत अचानक आणि अनपेक्षित असा राजकीय ट्विस्ट आल्याचे दिसून येत आहे. नव्या घडामोडींनुसार, निशांत कुमार हे राज्यसभेऐवजी थेट उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेऊ शकतात, अशी माहिती समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर जनता दल (युनायटेड) चे कार्यकारी अध्यक्ष संजय झा हे दिल्लीहून तातडीने पटनाकडे रवाना झाल्याची माहिती आहे. त्यांच्या या अचानक दौऱ्यामुळे नितीश कुमार राज्यसभेवर जाणार असल्याच्या चर्चेला अधिकच बळ मिळाले आहे.

दरम्यान, जर नितीश कुमार हे राज्यसभेचे खासदार झाले आणि त्यांनी बिहारच्या सक्रिय राज्यकारभारातून काही प्रमाणात बाजूला होत दिल्लीच्या राष्ट्रीय राजकारणात प्रवेश केला, तर बिहारमधील मुख्यमंत्रिपदाची जागा रिक्त होणार आहे. अशा परिस्थितीत सत्तासमीकरणात मोठे बदल होऊ शकतात. त्यानुसार, निशांत कुमार यांना उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते, तर मुख्यमंत्रीपद भारतीय जनता पक्षाकडे जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अंटार्क्टिकामध्ये 'वाराणसी'

दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांचा 'वाराणसी' हा चित्रपट घोषणेपासूनच लाइमलाइटमध्ये आला आहे. प्रियांका चोप्रा आणि महेशबाबू अभिनीत या चित्रपटाच्या निमित्ताने नवनवीन गोष्टी घडत आहेत. हा ॲक्शन-ॲडव्हेंचर अंटार्क्टिकामध्ये प्रत्यक्ष चित्रीकरण करणारा पहिला भारतीय चित्रपट ठरला आहे. चित्रपटसृष्टीच्या इतिहासात अंटार्क्टिकावर प्रत्यक्ष दृश्ये चित्रीत होणारा हा चौथा चित्रपट ठरला आहे. यापूर्वी जागतिक पातळीवरील 'साऊथ ऑफ सॅनिटी', 'द ओडिसी' आणि 'व्हायरस' या तीन चित्रपटांचे चित्रीकरण अंटार्क्टिकामध्ये झाले आहे. रॉस आईस शेल्फ या प्रदेशाचे चित्रीकरण पडद्यावर दाखवणारा 'वाराणसी' हा पहिलाच चित्रपट ठरल्याचे सांगितले जाते. पृथ्वीवरील सर्वांत कठीण आणि प्रतिकुल प्रदेशांपैकी एक असलेल्या या भागात प्रत्यक्ष चित्रीकरण करून 'वाराणसी'ने जागतिक स्तरावर दुर्मीळ श्रेणीत स्थान मिळवले आहे.




# तब्बूच्या प्रेमात संयुक्ता

वाथी', 'भीमला नायक', 'कडुवा' आणि 'विरुपाक्ष' या चित्रपटांद्वारे स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी संयुक्ता दिग्दर्शक पुरी जगन्नाथ यांच्या आगामी चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे. यात तिच्या जोडीला विजय सेतुपती असून, तब्बूही महत्त्वपूर्ण भूमिकेत आहे. तब्बूबाबत संयुक्ता म्हणाली की, तब्बू हे एक वेगळेच रसायन आहे. तब्बू ज्या ऊर्जेसह सेटवर वावरते, ते खूप भारावून टाकते. त्यांचा 'कंडुकोन्डैन कंडुकोन्डैन' हा चित्रपट माझ्या आवडत्या चित्रपटांपैकी एक आहे. यात त्या खूप सुंदर दिसल्या होत्या आणि आजही तितक्याच ग्रेसफुल आहेत. त्यांची हैदराबादी हिंदी खूपच गोड आहे. आमचे एकत्र फार सीन नव्हते, पण त्यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव अविस्मरणीय होता.





# रश्मिका विजयला म्हणते 'अहो देवा'!

विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना म्हणजेच 'विरोश' या नवदाम्पत्याचे नवे कोरे गाणे प्रदर्शित झाले आहे. लग्नाची थीम असलेले पोस्टर सादर केल्यानंतर 'रणबाली' चित्रपटाच्या निर्मात्यांनी 'एंधय्या सामी...' हे विशेष गाणे रिलीज केले आहे. या गाण्याद्वारे जणू दोघांनाही 'सुखी वैवाहिक जीवनाचा' संदेश देण्यात आला आहे. 'एंधय्या सामी...' याचा मराठी अर्थ 'अहो देवा' असा आहे. हे गाणे पारंपरिक वधू-स्वागत विधींसारख्या दृश्यांनी सुरू होते. ज्यामुळे लग्नसोहळ्याचे वातावरण तयार होते. त्यानंतर विजय आणि रश्मिका यांच्यातील रोमँटिक पाहायला मिळतात. राहुल संकृत्यान दिग्दर्शित 'रणबाली' हा चित्रपट वसाहतकालीन भारतात घडतो. या चित्रपटाला बंडखोरी व सूडाचीही पार्श्वभूमी आहे. हा चित्रपट सप्टेंबरमध्ये प्रदर्शित होणार आहे.



# न्यूझीलंड संघाची फायनलमध्ये धडक अन् दक्षिण आफ्रिका ठरली चोकर्स...

## फिन एलनचे झंझावाती शतक आणि सेफर्टची तुफानी साथ | ११७ धावांची सलामी भागीदारी ठरली निर्णायक

**महाईन्यूज | अलिबाग**

**न्यूझीलंड संघाने स्पर्धेत अजिंक्य राहिलेल्या दक्षिण आफ्रिका संघावर एकतर्फी विजय मिळवला आहे. यासह किवी संघाने अंतिम फेरीत धडक मारली आहे. न्यूझीलंड संघाने द. आफ्रिकेवर ९ विकेट्स आणि ४८ चेंडू राखून विजय मिळवला. संघाचे सलामीवीर फिन एलन व टीम सेफर्ट संघाच्या विजयाचा मार्ग तयार करून दिला. फिन एलनने अखेरच्या चेंडूवर वादळी शतक झळकावत संघाचा विजय निश्चित केला. यासह दक्षिण आफ्रिकेचा संघ फायनलच्या एक पाऊल जवळ येऊन स्पर्धेबाहेर झाला आहे.**



दक्षिण आफ्रिकेच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत एकही सामना गमावला नव्हता, त्यामुळे सेमीफायनल जिंकण्यासाठी संघ फेव्हरेट मानला जात होता. पण न्यूझीलंडने बाजी मारली. किवी संघाने प्रथम गोलंदाजी करताना वादळी सुरूवात केली आणि द. आफ्रिकेला १६९ धावांवर रोखलं. तर प्रत्युत्तरात १२.५ षटकांत १७० धावा चेस करत विक्रमी विजय मिळवला. किवी संघाच्या या विजयाचा हिरो ठरला शतकवीर फिन एलन.

दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या १७० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंड संघाची वादळी सुरूवात झाली. सलामीवीर फिन एलन व टीम सेफर्ट यांनी पहिल्या विकेटसाठी ११७ धावांची विक्रमी भागीदारी रचली. यासह किवींनी पॉवरप्लेमध्ये एकही विकेट न गमावता ८६ धावा केल्या होत्या. सेफर्ट ३३ चेंडूत ७ चौकार व २ षटकारांसह ५८ धावा करत बाद झाला. पण फिन एलनने विक्रम रचत ३३ चेंडूत १० चौकार व ८ षटकारांसह शतकी खेळी साकारली. तर रचिन रवींद्रने १३ धावा करत त्याला साथ दिली.

संपूर्ण स्पर्धेत कमालीच्या गोलंदाजी आक्रमणासह उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजीला न्यूझीलंड संघाने सुरूंग लावला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने संपूर्ण सामन्यात साजेशी कामगिरी न केल्यामुळे संघाला हा मोठा पराभव पत्करावा लागला आणि पुन्हा एकदा त्यांना चोकर्सचा टॅग मिळाला आहे.

न्यूझीलंड संघाने नाणेफेक जिंकत दक्षिण आफ्रिकेला गोलंदाजीसाठी पाचारण केलं आणि दुसऱ्याच षटकात मॅककॉन्चीने २ विकेट्स घेत हा निर्णय योग्य सिद्ध केला. क्विंटन डी कॉक व रायन रिकल्टन स्वस्तात बाद झाले. यानंतर डेवाल्ड ब्रेविस व एडन मारक्रम यांनी संघाचा डाव सावरला. पण रचिन रविंद्रची फिरकी पुन्हा एकदा प्रतिस्पर्धी संघावर भारी पडली. ब्रेविस ३४ धावा करत बाद झाला. तर फर्ग्युसनने स्टब्सला क्लीन बोल्ड करत दक्षिण आफ्रिकेची भागीदारी तोडली.

दक्षिण आफ्रिकेनंतर ७७ धावांवर ५ विकेट्स गमावल्या होत्या. पण त्यानंतरही मार्को यान्सनने ३० चेंडूत २ चौकार व ५ षटकारांसह ५५ धावांची महत्त्वाची खेळी केली. यामुळेच संघ २० षटकांत १६९ धावांपर्यंत पोहोचू शकला. न्यूझीलंड संघाकडून मॅट हेन्री, कोले मॅककॉन्ची व रचिन रवींद्र यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर लॉकी फर्ग्युसन व जेम्स नीशम यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

---

# अभिषेक शर्माला फक्त एकाच अटीवर संघात संधी द्या, अन्यथा...

**महाईन्यूज | अलिबाग**

**टी-२० विश्वचषकाच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत भारत मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर इंग्लंडशी भिडणार आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या अखेरच्या सुपर-८ सामन्यात विजय मिळवल्यानंतर टीम इंडियाने सेमीफायनलमध्ये धडक मारली. पण अभिषेकच्या फॉर्मबद्दल भारतीय संघ नक्कीच चिंतेत असेल, ज्याने आतापर्यंत सहा डावांमध्ये एका अर्धशतकासह ८० धावा केल्या आहेत. आता, भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी एका अटीवर अभिषेकला उपांत्य फेरीत संधी द्यावी असा सल्ला दिला आहे.**

अभिषेक शर्मा टी-२० विश्वचषकातील सुरूवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये शून्यावर बाद होत माघारी परतला. यानंतर त्याने दक्षिण आफ्रिकेविरूद्ध धावांचं खातं उघडलं पण स्वस्तात बाद झाला. यानंतर झिम्बाब्वेविरूद्ध सामन्यात त्याने अर्धशतकी खेळी केली. पण त्यानंतर वेस्ट इंडिजविरूद्ध सामन्यातही त्याने लवकर विकेट गमावली. याशिवाय त्याने या सामन्यात २ महत्त्वाचे झेलदेखील सोडले.

रवी शास्त्री अभिषेक शर्माबद्दल म्हणाले, “संघ व्यवस्थापनाला जर असं वाटलं की मानसिकदृष्ट्या तो सध्या योग्य स्थितीत नाही, त्याचा आत्मविश्वास ढासळलेला आहे, तर त्याचा निर्णय त्यांनी घेत त्याला ड्रॉप करायचं आहे. त्याच्याशी संवाद साधून, नेट्समध्ये तो कसा फलंदाजी करतोय हे पाहूनच बाहेरून त्याचा अंदाज घेता येईल. जर अशी स्थिती असेल, तरच मी इशान किशनला वरच्या क्रमांकावर पाठवण्याचा विचार करेन आणि कदाचित रिंकू सिंहला खालच्या फळीत आणेन,” असं शास्त्री म्हणाले.






मात्र, अभिषेक शर्माला प्लेईंग इलेव्हनमध्ये कायम ठेवायला हवं, यावर त्यांनी पुन्हा एकदा ठामपणे भर दिला. इंग्लंडविरुद्धची त्याची यापूर्वीची यशस्वी कामगिरी आणि वानखेडे स्टेडियममधील फलंदाजीस पोषक परिस्थिती ही त्याला संधी देत राहण्यासाठी मजबूत कारणं असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. शास्त्री म्हणाले, “मात्र, तरीही मी त्याच्यावर विश्वास ठेवेन. भारता आणि इंग्लंड यांच्यातील मालिकेत खेळताना त्याने अफलातून कामगिरी केली होती. वानखेडेवरील त्याचं योगदान मी दुर्लक्षित करणार नाही. त्याने यापूर्वी चांगली कामगिरी केली आहे. तिथे त्याच्या नावावर शानदार जलद शतकं आहेत. फलंदाजीत पुरेसं सामर्थ्य आहे, त्यामुळे मी त्याच्यावरच ठाम राहीन,” असंही त्यांनी स्पष्ट केलं.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार ।
दि. 05 मार्च 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# भामा आसखेड जॅकवेलमुळे राष्ट्रवादीची नाचक्की!

## “चाणक्यांचा” डाव फसला : युवा नेते पार्थ पवार बोध घेतील काय?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी महत्त्वाकांक्षी असलेला भामा आसखेड प्रकल्पाच्या कामाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार गट) माजी नगरसेवक अजित गव्हाणे आणि त्यांचे राजकीय सल्लागार सीमा सावळे- सारंग कामतेकर यांना मुंबई उच्च न्यायालयाने दणका दिला आहे. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेवर आक्षेप घेत दाखल केलेली जनहित याचिका मा. न्यायालयाने फेटाळून लावली आहे.**



### याचिकादारांवर खर्चाचा भार

मुंबई उच्च न्यायालयामध्ये या खटल्यावर सुनावणी सुरू होती. अनेक तारखांना अजित गव्हाणे उपस्थित राहीले नाहीत. त्यांना आपली बाजुही प्रभावीपणे मांडता आली नाही. अखेर दि. 25 जुलै 2025 रोजी मा. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संदीप मारणे यांनी निकाल दिला. “संपूर्ण प्रकरणाचा विचार करता, आम्ही या टप्प्यावर याचिकादारांच्या विनंतीवरून संबंधित निविदा प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप करण्याच्या भूमिकेत नाही. त्यामुळे सार्वजनिक हित याचिका (PIL) त्यानुसार निकाली काढण्यात येत आहे. दि. 2 मे 2023 रोजीच्या आदेशानुसार या न्यायालयात ठेवलेली रक्कम याचिकादारांना परत घेण्याची मुभा देण्यात येत आहे, कारण आम्ही त्यांच्यावर खर्च लादण्याच्या मतावर नाही.” अशा शब्दांत मा. न्यायालयाने निकाल दिला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या वेळी आमदार महेश लांडगे यांना ‘टार्गेट’ करण्यासाठी अजित गव्हाणे यांनी भामा आसखेड प्रकल्प आणि जॅकवेलच्या कामावरुन आरोपांची राळ उठवली होती. तसेच, दि. 2 मे 2023 रोजी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करुन सदर कामाला आव्हान दिले होते. या न्यायालयीन प्रक्रियेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला प्रतिवादी करण्यात आले. त्यामुळे शहराचीही बदनामी झाली होती.

विशेष म्हणजे, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना चुकीच्या ‘इनपूट’ आणि ‘बेसलेस’ टीकेचे मुद्दे देण्यात आले. त्याचे पडसाद महापालिका निवडणुकीत उमटले. अजित पवार आणि महेश लांडगे यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात आरोप-प्रत्यारोप झाले आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC)ने दि. 28 जुलै 2022 रोजी भामा-आसखेड धरणाजवळील वाकी तर्फे वाडा गावात हेडवर्क्ससह जॅकवेल, पंप हाऊस, अप्रोच ब्रिज, इनटेक चॅनल, नागरी, यांत्रिक, विद्युत, इन्स्ट्रुमेंटेशन, SCADA आणि इतर कामे तसेच 10 वर्षांची देखभाल व संचालन या कामांसाठी निविदा काढली होती. सदर काम करणारी ठेकेदार कंपनीवर विविध गुन्हे दाखल आहेत. तसेच, कंपनीला काळ्या यादीत टाकले आहे. कंपनीने माहिती लपवून सदर काम मिळवले आहे. निविदा प्रक्रियेसाठी अपात्र असताना सदर काम देण्यात आले, असा आरोप अजित गव्हाणे यांनी केला होता. विशेष म्हणजे, सदरचे काम आमदार महेश लांडगे यांच्या हस्तक्षेपाने देण्यात आले, असा दावाही त्यांनी जाहीरपणे प्रसारमाध्यमांकडे केला होता. तसेच, विधानसभा अधिवेशनामध्येही हा मुद्दा गाजला. त्यामुळे शहराची राज्यात बदनामी झाली होती.

आता राष्ट्रवादीच्या निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका घेणारे युवा नेते पार्थ पवार यांनी ‘मिसगाईड’ करणाऱ्या लोकांपासून सावध रहावे. शहराच्या पातळीवर संघटनात्मक आणि महापालिकेतील निर्णय प्रक्रियेमध्ये अशा संधीसाधू लोकांना दूर ठेवावे, अशी भावना बोलून दाखवली जात आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ७ व ८ मार्चला ‘अटल महाआरोग्य शिबिर’

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या ६३ व्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड येथे ११ व्या ‘अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिरा’चे आयोजन करण्यात आले आहे. ७ आणि ८ मार्च २०२६ रोजी नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर हे शिबिर होणार असून, महाराष्ट्रातील नामवंत रुग्णालये आणि तज्ज्ञ डॉक्टर सहभागी होणार आहेत. अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली.**




आमदार शंकर जगताप यांनी याबाबत माहिती दिली. या शिबिराचे उद्घाटन सकाळी १० वाजता होईल. सायंकाळी ५ वाजेपर्यंत रुग्णांची तपासणी व उपचार केले जाणार आहेत. ‘लक्ष्मणभाऊंचा वारसा रुग्णसेवेचा, संकल्प जनतेच्या निरोगी आयुष्याचा’ हे ब्रीद समोर ठेवून शिबिराचे नियोजन करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिरात साध्या तपासणीपासून ते जटिल शस्त्रक्रियांपर्यंतच्या मार्गदर्शनाबाबत सुविधा उपलब्ध आहेत. हृदयरोगांसाठी एन्जोप्लास्टी, हृदयाच्या झडपांची शस्त्रक्रिया तसेच लहान मुलांच्या हृदयातील छिद्रावर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. कॅन्सर तपासणी, केमोथेरपी व रेडिएशनबाबत मार्गदर्शन दिले जाईल. गुडघे व खुबा प्रत्यारोपण, मोतीबिंदू, प्लास्टिक सर्जरी आणि मणक्याचे आजार यांवरील शस्त्रक्रियाही केल्या जाणार आहेत. एमआरआय, सिटी स्कॅन, मॅमोग्राफी, सोनोग्राफी व डायलिसिस यांसारख्या तपासण्या उपलब्ध राहतील. तसेच फिजिओथेरपी, आयुर्वेदिक उपचार, पंचकर्म, होमिओपॅथी आणि मोफत औषध वाटपाची सुविधा देण्यात येणार आहे.

### शहरातील नामांकित रुग्णालयांचा सहभाग

यात वायसीएम, ससून सर्वोपचार रुग्णालय, आदित्य बिर्ला मेमोरियल रुग्णालय, जहांगीर रुग्णालय, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, रुबी हॉल क्लिनिक, सह्याद्री रुग्णालये आणि डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय यांसारख्या नामांकित संस्थांचा समावेश आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या नागरिकांनी ओळख व पत्त्याचा पुरावा म्हणून आधार कार्ड, रेशन कार्ड किंवा मतदान ओळखपत्र तसेच जुने वैद्यकीय अहवाल सोबत आणावेत, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

“ लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी राजकारणापलीकडे जाऊन समाजकारणाला आणि त्यातही प्रामुख्याने रुग्णसेवेला महत्व दिले. ‘अटल महाआरोग्य शिबिर’ केवळ उपक्रम नसून, हा एक पवित्र सेवायज्ञ आहे. ज्या गोरगरीब रुग्णांना मोठ्या रुग्णालयातील खर्च पेलवत नाही, त्यांना एकाच छताखाली तज्ज्ञ डॉक्टर्स आणि मोफत शस्त्रक्रिया मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हीच भाऊंना खरी श्रद्धांजली आहे. यावर्षी आम्ही तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक अचूक तपासण्यांवर भर दिला आहे.” यात नामांकित रुग्णालय, डॉक्टर सहभागी होणार आहे.

- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.

# डॉ.डी.वाय.पाटील कॉलेजमध्ये रौप्यमहोत्सवी वर्ष उत्साहात!

## माजी विद्यार्थी मेळावा : उद्योग-शिक्षण समन्वयातून संस्थेच्या विकासाला नवी दिशा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित भव्य माजी विद्यार्थी मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध वर्षांच्या तीनशेहून अधिक माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्नेह, आठवणी आणि संवादाने भरलेला अविस्मरणीय सोहळा अनुभवला.**



या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून ALKEM LABORATORIES LIMITED चे उपाध्यक्ष (मार्केटिंग व सेल्स) समीर श्रीवास्तव उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाच्या प्रशासकीय मंडळाचे सदस्य डॉ. रमेश जुनेजा (एम.डी. व सीईओ, BJW HEALTHCARE PVT. LTD.) यांची उपस्थिती लाभली. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष व 3M INDIA HEALTHCARE PVT. LTD. मध्ये हेल्थकेअर सेल्स क्षेत्रातील व्यावसायिक विशाल सेनगावकर, तसेच तळेगाव दाभाडे नगरपरिषदेचे आयुक्त गिरीश दापकेकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी कार्यक्रमास हजेरी लावली.

कार्यक्रमादरम्यान विविध बॅचमधील माजी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा देत भावनिक वातावरण निर्माण केले. परस्पर संवादातून नेटवर्किंग वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला. माजी विद्यार्थ्यांसाठी मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात मजेदार खेळ, संगीत, सांस्कृतिक सादरीकरणे आणि मुक्त संवाद सत्राचा समावेश होता. यावेळी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांनी माजी विद्यार्थी हे संस्थेचे खरे बळ असल्याचे नमूद केले. त्यांच्या अनुभवाचा सध्याच्या विद्यार्थ्यांना मोठा लाभ होऊ शकतो, असे सांगत विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी करिअर मार्गदर्शन, इंटर्नशिप आणि रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. उद्योग-शैक्षणिक सहकार्य वाढविण्यात माजी विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयामुळे आपला सर्वांगीण विकास झाल्याचे सांगितले. गेल्या २५ वर्षांतील संस्थेच्या उल्लेखनीय प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातील वाटचालीसाठी संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. मेळाव्याच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल महाविद्यालयाचे कौतुकही करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन माजी विद्यार्थी संघटनेच्या सचिव डॉ. शुभांगी दसवडकर, खजिनदार डॉ. सारिका निकम, डॉ. सोनाली महापराळे, प्रा. मुकेश मोहिते आणि प्रा. अश्विनी गावीत यांनी केले. कार्यकारी समितीचे अध्यक्ष ललित निमेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी कुलकर्णी आणि श्रेयसी देशमुख यांनी प्रभावीपणे पार पाडले. हा मेळावा माजी विद्यार्थी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील नातेसंबंध अधिक दृढ करणारा ठरला असून भविष्यात अशा उपक्रमांमुळे महाविद्यालयाच्या प्रगतीस निश्चितच चालना मिळेल, अशी भावना संस्थेचे संचालक रिअर ॲडमिरल अमित विक्रम (नि.) यांनी व्यक्त केली.

रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित मेळावा हा केवळ स्नेहसंमेलन न राहता उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील दुवा मजबूत करणारा व्यासपीठ ठरला. विविध औषधनिर्माण व आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगजगताशी संपर्क साधण्याची संधी मिळाली. करिअर मार्गदर्शन, इंटर्नशिप, प्लेसमेंट आणि संशोधन सहकार्य यांसारख्या संधींसाठी माजी विद्यार्थ्यांचे नेटवर्क प्रभावी माध्यम ठरू शकते. त्यामुळे संस्था केवळ शैक्षणिक केंद्र न राहता उद्योगाभिमुख कौशल्य विकासाचे केंद्र म्हणून अधिक सक्षम होण्यास मदत होते.

### गुणवत्तावृद्धी व ब्रँड मूल्य वाढीस चालना

२५ वर्षांच्या प्रवासात संस्थेने केलेल्या प्रगतीचा आढावा घेताना माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग हा संस्थेच्या गुणवत्तावृद्धीचा निर्देशक ठरतो. विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत असलेले माजी विद्यार्थी संस्थेच्या प्रतिमेला बळकटी देतात. त्यांचा अनुभव, अभिप्राय आणि सहकार्य यामुळे अभ्यासक्रम सुधारणा, उद्योगसहभाग, संशोधन प्रकल्प आणि सामाजिक उपक्रमांना चालना मिळू शकते. अशा मेळाव्यांमुळे संस्थेचे ब्रँड मूल्य वाढण्यासोबतच भावी विद्यार्थ्यांसाठीही आकर्षण निर्माण होते, ज्याचा दीर्घकालीन परिणाम संस्थेच्या सर्वांगीण विकासावर होतो.

# शिक्षण विश्व: हेल्थकेअर आणि बायोटेक विभागात यश, रु. ३० हजारांचे पारितोषिक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पॅकबंद खाद्यपदार्थांची गुणवत्ता ओळखण्यासाठी उपयुक्त ठरणारे "फूड डिकोड ए आय" हे मोबाईल ॲप विकसित करणाऱ्या पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक (पीसीपी) मधील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने "ग्रॅव्हिटी २के२६ - पिच परफेक्ट" स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. आर्य माडीवाले असे या विद्यार्थ्याचे नाव असून त्याला प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि रु. ३०,००० रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.**



ही स्पर्धा ट्रिनिटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग, पिसोळी येथे आयोजित करण्यात आली होती. विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील १८० हून अधिक स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. हेल्थकेअर आणि बायोटेक, फिनटेक आणि ई-कॉमर्स, ॲग्रीटेक आणि ग्रामीण सक्षमीकरण, सस्टेनेबल सोल्युशन्स व स्मार्ट सिटीज, तसेच स्किल्स आणि एज्युटेक अशा विविध विषयांवर प्रकल्प सादर करण्यात आले.

आर्य माडीवाले याच्या 'फूड डिकोड ए आय' या प्रकल्पाला हेल्थकेअर आणि बायोटेक विभागात द्वितीय क्रमांक मिळाला. हे ॲप वापरकर्त्यांना पॅकबंद खाद्यपदार्थ खरेदी करताना त्यावरील बारकोड स्कॅन करून संबंधित उत्पादनाचा न्यूट्री-स्कोर, फॅटचे प्रमाण व इतर पोषणमूल्यांची माहिती तत्काळ उपलब्ध करून देते. तसेच संबंधित पदार्थाला अधिक चांगला पर्याय कोणता असू शकतो, याचीही माहिती ॲपद्वारे मिळते.

पीसीईटी कार्यालयात अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते आर्य माडीवाले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीपीच्या प्राचार्या डॉ. विद्या बॅकॉड, तसेच संगणक विभाग प्रमुख मंगला माळकर उपस्थित होते.

### उच्च दर्जाच्या शिक्षण सुविधा

या ॲपमधील 'स्मार्ट कार्ट' फीचरद्वारे खरेदी केलेल्या सर्व वस्तूंचे एकत्रित हेल्थ रेटिंग समजते. मधुमेहासारख्या आजारांबाबत आहार मार्गदर्शन, तसेच चॅटबॉटच्या माध्यमातून आरोग्यविषयक सल्ला देण्याची सुविधा देखील यात उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती विकसित व्हावी आणि त्यांच्या संशोधनाचा समाजाला उपयोग व्हावा, यासाठी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) मार्फत उच्च दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

# DY Patil College of Engineering Emerges Runner-Up at Pentacle 2026

## Outstanding Performance Among 32 Highly Competitive Teams

**MahaEnews | PUNE**

**THE FOOTBALL TEAM OF D Y PATIL COLLEGE OF ENGINEERING SHOWCASED EXCEPTIONAL TALENT AND DETERMINATION BY SECURING THE PRESTIGIOUS RUNNER-UP POSITION AT PENTACLE 2026, AN INTER-COLLEGIATE SPORTS TOURNAMENT ORGANIZED BY MKSSS CUMMINS COLLEGE OF ENGINEERING FOR WOMEN.**




The tournament was held from 27th February to 1st March 2026 at Karve Nagar, Pune, and witnessed participation from 32 competitive teams.

Demonstrating remarkable teamwork and resilience, the DY Patil football squad delivered an outstanding performance throughout the event. On 28th February, the team clinched two crucial victories, successfully advancing to the next stage of the tournament. Continuing their winning momentum on 1st March, they secured two more impressive wins, earning a well-deserved place in the finals.

In the championship match, the team fought valiantly in a thrilling and closely contested encounter. Although they narrowly missed lifting the title, their spirited performance and sportsmanship earned widespread appreciation from spectators and organizers alike.

The team was captained by Shreyash Bokade and comprised Atharv Savekar, Pravin Korde, Sarvesh Charati, Parth Pawar, Ansh Munde, and Tejas Patil. The players were guided by Mr. Abaji Mane, Director of Physical Education & Sports, whose strategic mentorship and unwavering encouragement played a vital role in the team's remarkable journey.

This achievement has brought immense pride to DY Patil College of Engineering, Akurdi, and stands as a testament to the institution's growing excellence in sports alongside academics.

# D Y Patil College of Engineering Football Team Secures Runner-Up Position

**MahaEnews | PUNE**

**THE FOOTBALL TOURNAMENT CONCLUDED ON 1ST MARCH 2026, MARKING A PROUD AND MEMORABLE ACHIEVEMENT FOR D Y PATIL COLLEGE OF ENGINEERING. THE FOOTBALL BOYS TEAM SECURED THE PRESTIGIOUS RUNNER-UP POSITION AT THE CUMMINS PENTACLES (MEN'S) TOURNAMENT, HOSTED AT MKSSS CUMMINS COLLEGE OF ENGINEERING FOR WOMEN.**



Competing against several strong, skilled, and determined teams, our players demonstrated exceptional teamwork, remarkable resilience, unwavering discipline, and exemplary sportsmanship throughout the entire duration of the tournament. From the very first match to the final whistle, the team maintained focus, composure, and a positive mindset. Their consistently impressive, well-coordinated, and commendable performances not only reflected their preparation and match awareness but also earned them well-deserved recognition, widespread appreciation, and enthusiastic applause from spectators, organizers, and fellow participants.

The management and administration wholeheartedly congratulated the team for their outstanding and memorable accomplishment, describing it as a proud milestone for the institution. Campus Trustee Mr. Tejash Patil sincerely appreciated the team's dedication, commitment, perseverance, and relentless hard work, stating that such achievements are the result of sustained effort and strong determination. Director Radm (Retd) Amit Vikram lauded the players for their exemplary discipline, unity, and competitive spirit displayed consistently throughout the tournament, emphasizing that their performance brought honor to the college. Principal Dr. Mrs. P. Malathi extended her heartfelt congratulations and encouraged the team to continue striving for greater excellence, maintain their momentum, and aim for championship titles in future competitions. Dean Administration Dr. S. S. Sarnobat and Dean Affairs Dr. Smita Pataskar also expressed immense pride, satisfaction, and appreciation for the team's commendable success and sporting attitude.

Director of Physical Education Mr. Abaji S. Mane congratulated the players and highlighted that this significant achievement is a true reflection of their rigorous training sessions, disciplined practice routines, strategic planning, strong unity, and unshakable determination. He further noted that such accomplishments inspire other students to actively participate in sports and contribute to the institution's sporting legacy. The entire college fraternity proudly celebrates this historic and memorable moment and extends its best wishes to the team for continued success, greater victories, and many more remarkable accomplishments in the upcoming tournaments.

PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI

# Balancing Sports and Academics for All-Round Development

## ADMISSIONS OPEN

Grade Nursery to Grade XII



## WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

+91 9890613333 | +91 9373073077

pgosm05@gmail.com www.priyadarshanischoolmoshi.in